पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक ३४**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. १५/११/२०१६** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **महात्मा जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**उत्पन्नाचा आढावा**

**विषय क्र. १६७६**

स्थानिक संस्था कर कार्यालयाकडील सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षातील माहे सप्टेंबर २०१६ अखेर व्यापाऱ्यांची नोंदणी व जमा झालेले उत्पन्न याबाबत मा. सह महापालिका आयुक्त , स्थानिक संस्था कर यांचे जा.क्र. स्थासंक/५८७५ दि.३/११/२०१६ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. १६७७**

मा.सौ.सुषमा निम्हण व मा.बाळासाहेब बोडके, अध्यक्ष-स्थायी समिती यांचे दि.५/११/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र. १० ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. ३० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक, प्रभाग क्र. १० ब मध्ये विठ्ठलनगर विविध ठिकाणी जुन्या ड्रेनेज लाईन बदलून मोठया व्यासाची लाईन टाकणे (झेडई१६बी१०२/एसडी२-३३) | ३० लाख | --- |
| नविन सुचविलेली कामे<br>१) प्रभाग क्र. १० ब पाषाण येथे रिटेनिंग वॉल बांधणे<br>२) प्रभाग क्र. १० ब पाषाण, सुतारवाडी येथे खांडकी बाकडे बसविणे | <br>---<br>--- | <br>२५ लाख<br>५ लाख |

**माहितीसाठी आलेले विषय**

**विषय क्र. १६७८**

सह महापालिका आयुक्त, परिमंडळ क्र. ३ कार्यालयाचे नियंत्रणाखालील क्षेत्रिय कार्यालयांकडील महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार सन २०१६-१७ मधील सह महापालिका आयुक्त, परिमंडळ ३ यांचे पत्रासोबत जोडल्याप्रमाणे कार्यादेश देण्यात आलेल्या कामाची मासिक यादी (माहे सप्टेंबर २०१६) माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.सह महापालिका आयुक्त, परिमंडळ क्र. ३ यांचे जा.क्र. समआ-३/६०५ दि.४/११/२०१६ चे पत्र.

**संकिर्ण**

**विषय क्र. १६७९**

स्मार्ट सिटी अभियानासाठी पुणे महानगरपालिकेचा १०० कोटी इतका हिस्सा 'पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड' यांना अदा करणेसाठी खालील बाबीस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/उआ(वि)/७४५ दि.५/११/२०१६ चे पत्र.

१)मे.केंद्र शासनाच्या आदेशाप्रमाणे वित्तीय वर्ष सन २०१५-१६ व सन २०१६-१७ या दोन वर्षासाठी र.रुपये १०० कोटी इतकी रक्कम खालील अर्थशिर्षकावरुन 'पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड' ला अदा करणेस अर्थशिर्षक आरई६४अे१०१, यावरती ज.ने.रा.श.पु.अ., अमृत व स्मार्ट सिटी अभियान अंतर्गत मनपाचा हिस्सा, तरतुद र.रुपये १,१७,९७,३१,७००/-

२) 'पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड' यांचे नावे धनादेश/धनाकर्ष काढणेस

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**